# नि. क्र. २० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा दि.०८.०६.२०१६ रोजी नि.क्र. १६ व १९ वर पारीत केलेला आदेश रद्द करण्यासाठी प्रतिवादींनी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे कथन आहे की, नि.क्र. १६ व १९ च्या आदेशानुसार प्रतिवादी हे रु.५००/– रक्कम न्यायालयात वेळेवर भरु शकले नाहीत कारण प्रतिवादी क्र. १ ची आई ही वयोवृध्द असल्यामुळे प्रतिवादी हे न्यायालयात येऊ शकले नाहीत व पैसे भरु शकले नाहीत. प्रतिवादींनी नैसर्गीक न्यायासाठी दि. ०८.०७.२०१७ रोजीचा आदेश रद्द करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादीच्या वकीलांनी त्यांचे म्हणणे सादर केले की, प्रतिवादींनी सदरचा अर्ज कोणतेही कायदेशिर कारण न दाखविता दिलेला आहे. प्रतिवादींना ५००/– रुपये रक्कम भरण्याचा आदेश झालेला असतांना सुध्दा त्यांनी सदरची रक्कम वेळेत भरली नसल्यामुळे प्रतिवादींचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला. वादींच्या वकीलांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखावरुन दिसून येते की, प्रतिवादींना नि.क्र. १६ व १९ च्या संयुक्त आदेशाद्वारे रक्कम रुपये ५००/– भरण्याचा आदेश पारीत करण्यात आला होता, परंतू प्रतिवादींनी सदरची रक्कम वेळेत भरलेली नाही. परंतू नैसर्गीक न्यायाच्या तत्वानुसार प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच येथे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादींनी त्यांना आदेशित केलेली रक्कम वेळेत भरली नाही, त्यामुळे प्रकरणामध्ये विलंब झालेला आहे. त्यासाठी त्यांना दंड

आकारणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## – आदेश –

दि. ०८.०६.२०१७ रोजी पारीत केलेला आदेश हा प्रतिवादींनी अतिरिक्त खर्च रक्कम रुपये ३००/–वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

दिनांक १७.०७.२०१७
ठिकाण – चाकूर

(**जी.बी. जानकर** )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | M. B. Pathan |
| Name of the Court | :- | Civil Judge, J.D., Chakur. |
| Date of Judgment | :- | 17.07.2017 |
| Judgment signed by Presiding Officer on | :- | 17.07.2017 |
| Judgment uploaded on | :- | 17.07.2017 |